**सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधकाम करण्यात येणाऱ्या रस्ते व इमारतीच्या खर्चात आकारण्यात येणारे ई.टी.पी. शुल्क (आस्थापना, हत्यारे व संयंत्र खर्च) रद्द करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-२०२५/प्रक्र.१५/अर्थ-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक:- ०१ एप्रिल, २०२६

**<u>प्रस्तावना:-</u>**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संनियंत्रणाखाली रस्ते व इमारती उपक्षेत्रातंर्गत खुद्द व इतर उपभोक्ता विभागाचे प्रकल्प कार्यान्वित केले जातात. सदर प्रकल्पांकरिता विभागाच्या कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या सेवा घेण्यात येत असत. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे यापूर्वी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असणारे बांधकाम साहित्य व यंत्रसामुग्री (विविध बांधकाम उपयोगी वाहने, हत्यारे, इत्यादी) विभागाकडून कार्यान्वित करण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठी उपलब्ध करण्यात येत होते.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येत असलेल्या विविध कामावरील आस्थापना व सयंत्रावरील खर्चाचे योग्य निर्धारण करता यावे याकरिता महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिकेतील नियम ७२ मधील तरतूदीनुसार आस्थापना विषयक बाबीवरील खर्चाकरिता १३.९ % व हत्यारे व संयंत्र खर्चासाठी १.१ % असे एकूण १५ % शुल्क आकारण्यात येते. सदर बाबींसाठी आकारण्यात येणाऱ्या तरतूदी प्रतिकात्मक स्वरुपाच्या असून त्या वित्तीय वर्षाअखेर महालेखापाल कार्यालयाकडून खर्ची दर्शवण्यात येतात. सदर शुल्क हे केवळ पुस्तकी समायोजनाच्या स्वरुपात देण्यात येत असल्यामुळे सदर शुल्कासाठी प्रत्यक्ष कोणतेही निधी वितरण करण्यात येत नाही.

सद्यस्थितीत विभागाकडून कार्यान्वित करण्यात येणारे सर्व प्रकल्प विभागाच्या संनियंत्रणाखाली निविदा प्रक्रिया राबवून बाह्ययंत्रणेव्दारे हाती घेण्यात येतात. सदर प्रकल्पांच्या बांधकामकरीता आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामुग्री संबंधित बाह्यंयंत्रणादारे उपलब्ध केले जाते. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत कार्यव्ययी आस्थापना व भांडारशाखा अस्तित्वात नसल्याने शासनाची यंत्रसामुग्री बांधकामासाठी उपलब्ध करुन देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

उपरोक्त वस्तुस्थितीस अनुसरुन सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधकाम करण्यात येणाऱ्या रस्ते व इमारतीच्या सर्व कामांसाठी आकारले जाणारे ई.टी.पी शुल्क रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यान्वित करण्यात येणाऱ्या भांडवली खर्चाच्या लेखाशिर्षातंर्गत रस्ते व इमारती बांधकामांच्या सर्व प्रकल्पांसाठी मनुष्यबळ व इतर आस्थापना

विषयक बाबीवरील खर्चाकरिता १३.९ % व हत्यारे व संयंत्र खर्चासाठी १.१ % सेंटेस शुल्क असे एकूण १५ % ई.टी.पी. शुल्क दि.१ एप्रिल २०२६ पासून रद्द करण्यात येत आहे.

प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभाग अनौ.सं.क्र.२१२/व्यय-११ दि.१०.०६.२०२५ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार तसेच महालेखाकार (ले. व ह.) II, नागपूर, महाराष्ट्र यांच्या कार्यालयाच्या पत्र क्र. TM/Gr.II/UOR/SM-७३/२०२५-२६/२२२९ दि.२७.२.२०२६ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४०११६१७०७१९१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAVINDRA SITARAM JARANDE

Digitally signed by RAVINDRA SITARAM JARANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Works Department,
2.5.4.20=186D0F0FDD27C79B9B3F859A90EC537946C37D5876E64CE525D082E58E494C85, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=4D2DC3DBD5C0F35A66A84C93B4CEAD367C64CC2BC9D7391E9A053988A2F81B64, cn=RAVINDRA SITARAM JARANDE
Date: 2026.04.01 16:18:04 +05'30'

(रविंद्र जरांडे)

**आंतर वित्तीय सल्लागार व उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
४) मा.मंत्री (सा.बां.) यांचे खाजगी सचिव
५) मा.राज्यमंत्री (सा.बां.) यांचे खाजगी सचिव
६) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
७) सह सचिव, वित्त विभाग (व्यय), मंत्रालय, मुंबई-३२.
८) सह सचिव, वित्त विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई-३२.
९) सर्व सह/उप सचिव, सा.बां.वि. मंत्रालय, मुंबई-३२.
१०) संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, ५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
११) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१२) महालेखापाल १/२, लेखा अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१३) महालेखापाल १/२ लेखा परिक्षा महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१४) महालेखापाल,(वाणिज्यिक लेखा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१६) निवड नस्ती (कार्यासन अर्थ-२)